माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम,२००५मधील कलम १८(१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार

तक्रार क्रमांक: ०१/२०२५

तक्रारकर्ता	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी
श्री. अशोक माणिकराव निस्ताने, रा. सिरसगांव (ध.) ता. जि. वर्धा	सचिव/ ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव (धनादय), पो. वायगांव (निपानी), ता. जि. वर्धा	विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, वर्धा ता. जि. वर्धा

सुनावणी दिनांक २३.०३.२०२६

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ८५४/२०२२ मध्ये दिनांक २१.०६.२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

सदर तक्रारीवर आज दिनांक २३.०३.२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव, श्री. पी. आर. राऊत व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, वर्धा, सौ. जया जि. परमार उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. ८५४/२०२२ मध्ये दिनांक २१.०६.२०२४ रोजी पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

"वरील दोन्ही व्यक्ती हे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी असल्याबाबत अपिलार्थी यांनी दावा केला असून ही वस्तुस्थिती लक्षात घेता, ज्या व्यक्तींना कलम ११ (१) अन्वये सुचना देण्यात आली होती त्या व्यक्ती जर ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी असल्यास कायद्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थाची पदाधिकारी असलेल्या किंवा सदस्य असलेल्या व्यक्तींना त्यांनी अवैद्य बांधकाम केले असल्यस शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले असल्यास अथवा दोन पेक्षा जास्त अपत्य असल्यास अपात्र ठरविण्याची प्रक्रिया करता येणे शक्य आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, मागितलेली माहिती ज्या व्यक्तींशी संबंधीत आहेत ते जर ग्रामपंचायतीचे पदाधिकारी असल्यास अथवा कुठल्याही सार्वजनिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी असल्यास अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ मध्ये मागितलेली माहिती ही त्यांना देण्याच्या निर्देशासह व याबाबतीतील जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका ही माहिती अधिकाराशी विसंगत असल्याचे मत नोदंवित प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे."

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक ३१.१२.२०२४ (प्राप्त दि. ३१.१२.२०२४) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "दिनांक २१.०६.२०२४ च्या आदेशाची अवहेलना होत असल्याबाबत व मागितलेली माहिती शासनाचा सर्व्हे नं. ३७/१ (जूना) अद्यावत सर्व्हे नं. १ मधील असून सचिवाने खोटी सादर केली असून सचिवावर शासकीय कारवाई व्हावी व मला न्याय मिळावा" अशी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारकर्ता यांच्या दिनांक ३१.१२.२०२४ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सचिव/ ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव (धनादय), पो. वायगांव (निपानी), ता. जि. वर्धा व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, वर्धा ता. जि. वर्धा यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. ०१/२०२५/तक्रार शाखा/१२४, दिनांक ०६.०१.२०२४ अन्वये द्वितीय अपील क्र. ८५४/२०२२ संदर्भात राज्य माहिती आयोग कार्यालयात दिनांक २१.०६.२०२४ रोजी सुनावणी होऊन आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर आदेशास अनुसरुन व तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल आयोग कार्यालयास त्वरित सादर करण्यात यावा, असे कळविण्यात आले होते.

तथापि, जन माहिती अधिकारी तथा सचिव/ ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव (धनादय), पो. वायगांव (निपानी), ता. जि. वर्धा व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, वर्धा ता. जि. वर्धा यांच्याकडून कोणताही अहवाल आयोगास प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

युक्तीवाद/खुलासा: - आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार पूर्णपणे खोटी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव, श्री. पी. आर. राऊत व प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, वर्धा, सौ. जया जि. परमार यांनी स्पष्ट केले की, आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दिनांक १६.१२.२०२४ च्या पत्रान्वये ग्रामपंचायतला उपलब्ध असलेल्या एकूण १३ झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

निष्कर्ष:- आयोगाने उपरोक्त व्दितीय अपील क्र. ८५४/२०२२ मध्ये दिनांक २१.०६.२०२४ रोजी दिलेले सदर आदेश दिनांक १८.०९.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले. सदर निर्गमित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय सिरसगांव (ध.) यांनी दिनांक १६.१२.२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थीस ग्रामपंचायत अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली आहे. परंतु सदर माहिती ही पूर्णपणे खोटी असल्याचा तक्रारकर्ता, श्री. अशोक निस्ताने यांनी सुनावणी दरम्यान आक्षेप नोंदविला आहे. त्यामुळे तक्रारकर्ता, श्री. अशोक निस्ताने यांनी केलेल्या द्वितीय अपील अर्जावर आयोगाने दिनांक २१.०६.२०२४ रोजी सुनावणी घेवून पारीत केलेल्या आदेशाचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव (धनादय) यांनी तंतोतंत पालन करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा आणि तक्रारकर्ता, श्री. अशोक निस्ताने यांचे समाधान

होईल, अशी योग्य प्रक्रिया पार पाडावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. व्दितीय अपील क्र. ८५४/२०२२ मध्ये दिनांक २१.०६.२०२४ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, सिरसगांव (धनादय) यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात तंतोतंत पालन करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व तक्रारकर्ता, श्री. अशोक निस्ताने यांचे समाधान होईल, अशी योग्य प्रक्रिया पार पाडावी.

२. या आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: २३.०३.२०२६

जा.क्र. 3820 दि. 2 C APR 2026